# महाराष्ट्र शासन
## जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे.

## ई — निविदा कार्यप्रणालीअंतर्गत निविदा सुचना क्रं. २, सन २०२३—२४

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे ४११००५ (दूरध्वनी क्रमांक ०२० — २५५३४७९९) हे जिल्हा न्यायालय, पुणे येथील व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयातील क्षेत्रफळ निहाय साफसफाईचे काम शासनमान्य कंत्राटदारामार्फत कंत्राटी सेवेने (आऊटसोर्सिगद्वारे) करुन घ्यावयाच्या कामाचे **दोन वर्ष** कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी, ई—निवीदा प्रणालीद्वारे पात्र निवीदाधारकांकडून ऑनलाईन निविदा मागवित आहेत. निविदाधारकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिध्द केलेल्या व कॉन्ट्रक्ट डाटामधील अटी तांत्रिक स्पेसिफीकेशन व मागील परिमाण व दर हे बिड डाटा निवीदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत.

<u>जिल्हा न्यायालय, पुणे.</u>

<u>तक्ता — अ</u>

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | साफसफाई करण्याचे क्षेत्र | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे | स्वच्छतागृह व शौचालय | ११०.७५ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | १२७६.५९ |
| | | न्यायालयीन परिसर | २८१००.०० |
| २ | दिवाणी न्यायालय, पुणे | स्वच्छतागृह व शौचालय | १०१.६० |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | १९९३.५९ |
| ३ | मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, पुणे | स्वच्छतागृह व शौचालय | ४९१.११ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | २१६०.४० |
| ४ | पिंपरी चिंचवड न्यायालय, पिंपरी, पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | ४३७४.४३ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | |

<u>तालुका न्यायालये</u>

<u>तक्ता — ब</u>

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | साफसफाई करण्याचे क्षेत्र | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय इमारत, बारामती ता. बारामती, जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | १५४.२५ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | १९२८.६८ |
| | | न्यायालयीन परिसर | १३१२८.५५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | नवीन न्यायालय इमारत, दिवाणी व फौजदारी न्यायालय, घोडनदी, शिरूर, ता. शिरूर, जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | २३.०१ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | ५१२०.०० |
| | | न्यायालयीन परिसर | |
| ३ | नवीन न्यायालय इमारत, दिवाणी व फौजदारी न्यायालय, इंदापुर ता. इंदापुर, जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | ३६०.०० |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | ४१५.५० |
| | | न्यायालयीन परिसर | ३१८७.०० |
| ४ | नवीन न्यायालय इमारत, दिवाणी व फौजदारी न्यायालय, दौंड, ता. दौंड जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | २४.१४ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | ५३८.२१ |
| | | न्यायालयीन परिसर | ९९९७.२३ |
| ५ | नवीन न्यायालय इमारत, दिवाणी व फौजदारी न्यायालय जुन्नर , ता. जुन्नर, जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | ३६०.०० |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | २६२९.०० |
| | | न्यायालयीन परिसर | २२८०.०० |
| ६ | नवीन न्यायालय इमारत, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, वडगाव मावळ ता. मावळ जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | १३८.२३ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | ६११.२४ |
| | | न्यायालयीन परिसर | ८२५९.९१ |
| ७ | अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय इमारत खेड–राजगुरूनगर ता. खेड, जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | १२४.३० |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | २१६.३० |
| | | न्यायालयीन परिसर | ४९५३.६१ |
| ८ | दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारत, घोडेगाव ता. आंबेगाव, जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | १२१.६९ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | ५२२.६९ |
| | | न्यायालयीन परिसर | ५९३०.०० |
| ९ | दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारत, भोर, ता. भोर, जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | ८८.०८ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | १२४९.१४ |
| | | न्यायालयीन परिसर | ६९०.०० |
| १० | दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारत, सासवड, ता. पुरंदर, जिल्हा पुणे. | स्वच्छतागृह व शौचालय | ६१.३६ |
| | | पॅसेजेस/कॉरीडॉर्स इ. | २०८.११ |
| | | न्यायालयीन परिसर | ४१५.०० |

| **कामाचे स्वरुप** |
|---|
| न्यायालयाच्या आवाराची स्वच्छता, न्यायालयातील सर्व स्वच्छतागृहांची साफसफाई, झाडलोट, तसेच इमारत व न्यायालयाचा परिसर स्वच्छ ठेवणे |

## —: ई — निवीदेचे वेळापत्रक :—

| | |
|---|---|
| ई—निविदा विक्रीचा कालावधी | दि.०१.१२.२०२३ वेळ सकाळी ११:०० ते दि.१५.१२.२०२३ वेळ सकाळी ११:०० पर्यत. |
| ई—निविदा सादर करण्याचा दिनांक | दि.१६.१२.२०२३ वेळ सकाळी ११:०० पर्यत |
| निविदा पूर्व बैठक दिनांक, वेळ व ठिकाण | दि.०६.१२.२०२३ वेळ सकाळी १०:३० वाजता, जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे. |
| तांत्रिक/व्यापारी ई—निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण | दि.१८.१२.२०२३ वेळ सकाळी ११:३० वाजता, जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर, पुणे. |

टिप :—

१) उपरोक्त ई निवीदा सुचनेतील अधिक माहितीकरिता इच्छुक निवीदाधारकांनी संकेतस्थळ **WWW.mahatenders.gov.in** मध्ये पहावे.

२) ई निवीदेचे वेळापत्रक, अटी व शर्तीसंबंधी अधिक माहिती संकेतस्थळ **WWW.mahatenders.gov.in** मध्ये पहावे.

३) ई — निवीदा सूचना **WWW.mahatenders.gov.in** मध्ये दिनांक ०१.१२.२०२३ रोजी सकाळी ११:०० ते दिनांक १५.१२.२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजे पर्यंत उपलब्ध होतील.

४) पुरवठादारांना ई — निवीदेबाबत काही अडचणी आल्यास Helpdesk Nos. Tel. No. 180030702232, Mob. No. + 91 – 7878007972, + 91 – 7878007973 किंवा या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक 020-25534799, 020-25534796 वर संपर्क साधावा.

५) अनामत रक्कम व टेंडर फी ऑनलाईन प्रणालीने स्विकृत होणार आहे. सदर ई—निविदेची रक्कम **रु. १५,०००/—** ऑनलाईन भरण्यात यावी.

६) सदर अनामत रक्कम ही कामाच्या म्हणजेच रक्कम रुपये **२,९८,०६,२६४/— वरती १.०० टक्के म्हणजे रु. २,९८,०६३/— (रक्कम रु. दोन लाख अठठयाण्ण त्रैसष्ठ मात्र)** इतकी राहील, सदर अनामत रक्कम ही ऑनलाईन प्रणालीने स्विकृत होणार आहे.

७) इतर अटी व शर्ती ई—निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील, सदर कामाची ई—निविदा कोणतेही कारण न देता रदद् करण्याचे अधिकार शासन/सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

स्वाक्षरी/—
प्र. प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

पुणे.
दिनांक :— २८.११.२०२३.

# निविदा अर्ज

निविदा मागविणा—या कार्यालयाचे नांव. : जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे.

| | |
|---|---|
| कामाचे स्वरुप | : बाहययंत्रणेद्वारे कंत्राटीपध्दतीने न्यायालयाच्या आवाराची स्वच्छता, न्यायालयातील सर्व स्वच्छतागृहांची साफसफाई, झाडलोट, तसेच इमारत व न्यायालयाचा परिसर स्वच्छ ठेवणे दोन वर्षे कालावधीसाठी अंदाजे रक्कम रुपये २,९८,०६,२६४/— जीएसटीसह रक्कम रुपये दोन कोटी अठठ्यान्नव लाख सहा हजार दोनशे चौसष्ठ फक्त) पर्यंत काम सेवासंविदा करारान्वये करुन घेणेबाबत. |
| निविदेचा क्रमांक | : निविदा क्रमांक २/२०२३—२४. |
| कार्यालयाचे नांव | : जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे. |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचे नांव | : |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचा संपूर्ण पत्ता | : |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचा संपर्क दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | : |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचा नोंदणी क्रमांक | : |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचा जीएसटी क्रमांक | : |

## <u>प्रपत्र — १ तांत्रीक लिफाफा क्रमांक—१</u>

**तांत्रिक लिफाफा क्र. ०१ मध्ये संस्थेने सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे.**

खालील नमूद कागदपत्रे तांत्रीक लिफाफा क्रमांक ०१ मध्ये अनुक्रमे सादर करुन, सदर कागदपत्रांवर १ ते १५ अनुक्रमांक नमूद करुन दाखल करावीत.

| अ.क्र. | आवश्यक कागदपत्रांची यादी |
|---|---|
| ०१ | कंपनी/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित सत्य प्रत. |
| ०२ | कंपनी/संस्थेचे पॅन कार्डची छायांकित सत्य प्रत. |
| ०३ | कंपनी/संस्थेचे सेवाकराच्या / जीएसटी प्रमाणपत्राची छायांकित सत्य प्रत. |
| ०४ | कंपनी/संस्थेचे प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्राची छायांकित सत्य प्रत. |
| ०५ | कंपनी/संस्थेचे पी.एफ. प्रमाणपत्राची छायांकित सत्य प्रत. |
| ०६ | कंपनी/संस्थेचे ई.एस.आय.सी प्रमाणपत्राची छायांकित सत्य प्रत. |
| ०७ | कंपनी/संस्थेचे (कमीत कमी १०० लेबर पुरवठा) व्हॅलिड लायसन्सच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्य प्रत (कामगार आयुक्त कार्यालयाने दिलेले) |
| ०८ | कंपनी/संस्थेचे मागील तीन आर्थिक वर्षाच्या आयकर प्रमाणपत्राची छायांकित सत्य प्रत मागील तीन वर्षाचे रिटर्न्स व ऑडिट रिपोर्ट (निविदा धारकाची सन २०२०—२०२१, २०२१—२०२२, २०२२—२०२३ या प्रत्येक वर्षाची उलाढाल रक्कम रू. २,००,००,०००/— अक्षरी दोन कोटी मात्र किंवा त्यापेक्षा जास्त असल्याबाबतचे चार्टर्ड अकाउंटंट यांचे कडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (ज्यावर सही शिक्का व UDIN नंबर असावा) जोडणे आवश्यक आहे.). |
| ०९ | ई—निविदाकाराकडे सदर कामाचा मागील दोन वर्षाचा शासकीय स्वच्छता सेवा पुरविण्याचे सिमीत्तर कामाचे अनुभव प्रमाणपत्र व सदयस्थितीत शासकीय संस्थेत प्रति चौ.मी. पध्दतीने कमीतकमी ३ कोटी रूपये उलाढाल असल्याचे स्वच्छता सेवा चालु असल्याची कार्यदेशाची छायांकित सत्य प्रत. |
| १० | सहकारी संस्था असल्यास मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय पुणे या नावाने निविदा भरणेबाबत मा. सहा. निबंधक, सहकारी संस्था यांचे चालु महिन्यातील अनुमती पत्र. |
| ११ | रू.४०,००,०००/— रूपये चाळीस लक्ष मात्र राष्ट्रीयकृत बॅकेचे शेडयुल बॅकेचे सॉल्वहन्सी प्रमाणपत्र निविदाधारकाने सादर करणे आवश्यक आहे. |
| १२ | गुणवत्ता सेवा प्रमाणपत्र ISO ९००१.२००८ जोडणे आवश्यक आहे. |
| १३ | शासकीय संस्थेत स्वच्छता सेवेचे कमीतकमी तीन कोटी रूपये व त्यापेक्षा जास्तीचे काम केल्याबाबत तसेच सन २०२२—२०२३ यावर्षी कमीतकमी १०० सफाई कर्मचारी कामावर असल्याबाबतच्या ई.एस.आय.व पी. एफ. च्या चलनाच्या छायांकित प्रति जोडणे आवश्यक आहे. |
| १४ | ई—निविदाकाराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र तसेच चालु महिन्यातील अद्यावत पोलिस चारित्र पडताळणी प्रमाणपत्र दाखल करावे. |
| १५ | कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने निविदेसोबत, ''निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या कार्यालयातील संपूर्ण भागाची तसेच आवाराची, स्वच्छतागृहांची व त्यातील कामाची पाहणी करुन त्यानुसार निविदा भरली आहे'' अशा आशयाचे हमीपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. |

Tender Inviting Authority: The Principal District Judge, District & Session Court, Shivajinagar, Pune 411005.

Name of Work : E-Tendering for Outsourcing the work of Mechanized and Manual Housekeeping Services for District & Sessions Court, Pune and it's sub-ordinates Taluka Court, in Pune Districts, All premises, for the period of two years. (Fill up the Percentage wise rate for the period of One Year With required Sweeper/Machinery, Material and GST Charges).

Contract No : 020 - 25531647 / 25534796

| | |
|---|---|
| Name of the Bidder/ Bidding Firm / Company : | |

PRICE SCHEDULE

(This BOQ template must not be modified/replaced by the bidder and the same should be uploaded after filling the relevent columns, else the bidder is liable to be rejected for this tender. Bidders are allowed to enter the Bidder Name and Values only )

| NUMBER # | TEXT # | TEXT # | NUMBER | NUMBER # | TEXT # |
|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Nature of Work | Units | 1. The Contractor Total Amount For the One Year Housekeeping Service Work.<br>2. Total Amount For the One Year Housekeeping Material.<br>3. Amount of GST for One Year (As per Central Govt. & Sate Govt. applicable at the time of Contract). | TOTAL AMOUNT Basic Charges, Material & Taxes | TOTAL AMOUNT In Words |
| 1 | 2 | 5 | 6 | 54 | 55 |
| 1 | 1. District & Sessions Court, Pune and it's sub-ordinates Taluka Court, in Pune Districts, All premises. Mechanized and Manual Cleaning and Housekeeping Services (Total Sweeper-Machinery, Materials, and GST applicable at the time of Contract)<br>2.Total Area in Sq. Mtrs. As per chart A & B | Nos | 14903132.00 | 14903132.00 | INR One Crore Forty Nine Lakh Three Thousand One Hundred & Thirty Two Only |
| Total in Figures | | | | 14903132.00 | INR One Crore Forty Nine Lakh Three Thousand One Hundred & Thirty Two Only |
| Quoted Rate in Figures | | Excess (+) | | 0.00 | INR Zero Only |
| Quoted Rate in Words | INR Zero Only | | | | |

## कंत्राटदारांसाठी विशेष सूचना

१) प्रपत्र १ मधील स्तंभ क्र. १ ते १५ मधील माहिती कंत्राटदारांनी सादर करावयाची आहे.

२) साफसफाईचे काम हे दोन वर्षासाठी असून साफसफाईसाठी लागणारे साहित्य, झाडू, ब्रश, निरमा, फिनेल, डांबरगोळया, ओडोनिल, बकेट इत्यादी साहित्य कंत्राटदाराने स्वत:चे वापरावयाचे आहे.

३) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्राची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

४) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे जीएसटी नोंदणी कराच्या प्रमाणपत्राची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

५) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने मागील तीन वर्षाच्या आयकर प्रमाणपत्रांची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

६) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने पॅनकार्डची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

७) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने निविदेसोबत, ''निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या कार्यालयातील संपूर्ण भागाची तसेच आवाराची, स्वच्छतागृहांची व त्यातील कामाची पाहणी करुन त्यानुसार निविदा भरली आहे'' अशा आशयाचे हमीपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

९) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने या कार्यालयास सादर करावयाची ई–निविदेमधील लिफाफा क्रमांक ०१ तांत्रीक लिफाफ्यामधील माहीती ही .pdf format मध्ये सादर करावी.

१०) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने या कार्यालयास सादर करावयाची ई–निविदेमधील लिफाफा क्रमांक ०२ व्यापारी लिफाफ्यामधील (BOQ) माहीती ही .xls format मध्ये टक्केवारीमध्ये निविदाचा दर सादर करावा. (निविदेचा दर हा २० टक्के पेक्षा कमी नसावा अन्यथा सदरची निविदा बाद ठरविण्यात येईल).

# जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे.

# निविदा सुचना

मे. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५ (दूरध्वनी कमांक ०२० – २५५३४७९९) हे जिल्हा न्यायालय, पुणे येथील व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयातील क्षेत्रफळानुसार साफसफाईचे काम शासनमान्य कंत्राटदारामार्फत कंत्राटी सेवेने (आऊटसोर्सिगद्वारे) करुन घ्यावयाच्या कामाकरीता दोन वर्ष कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी, ई–निवीदा प्रणालीद्वारे पात्र निवीदाधारकांकडून ऑनलाईन निवीदा मागवित आहेत. ई–निविदा दिनांक ०१.१२.२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या **WWW.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर प्रसारीत करण्यात येत आहे. तसेच सदर निविदा ही दिनांक ०१.१२.२०२३ रोजी सकाळी ११:०० ते दिनांक १५.१२.२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यत उपलब्ध होतील व सदर निविदा दिनांक १६.१२.२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजे पर्यंत सादर करता येतील.

**कामाचे स्वरुप** :– जिल्हा न्यायालय, पुणे व तालुका न्यायालय, आवारातील विविध न्यायालयीन इमारतीमधील सार्वजनिक स्वच्छतागृहांची, सार्वजनिक परिसराची (वऱ्हांडा) तसेच शिवाजीनगर न्यायालय येथील संपूर्ण परिसर व आवारामधील सर्व प्रकारची स्वच्छता करण्याचे काम दोन वर्षासाठी राहील.

**अटी व शर्ती** :–

१) कंत्राटदार हे जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे या न्यायालयाच्या इमारतीची व संपुर्ण परिसराची तसेच त्यांचे अखत्यारीतील तालुका न्यायालयांचे तक्ता–अ व तक्ता–ब मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रफाळानुसार साफसफाई करून घेतील.

२) ई–निविदा मध्ये भाग घेण्याकरिता कंत्राटदारांना डिजीटल सर्टिफिकेट काढणे आवश्यक आहे. डिजीटल सर्टिफिकेटसाठी (ETMS)ला संपर्क करावा. हेल्पडेस्क फोन नंबर १८००३०७०२२३२ मोबाईल नं. + ९१ ७८७८००७९७२, +९१ ७८–७८००७९७३ वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत व शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० व रविवारी बंद राहिल तसेच या कार्यालयाचे दूरध्वनी कमांक ०२०–२५५३४७९९ आणि ०२०–२५५३४७९६ वर सपंर्क करावा.

३) ई–निविदा सुचनेमध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार ई–निविदा पुस्तिका फॉर्म खरेदी/डाऊनलोड/बिड भरणे/बिड समाविष्ट करणे/सेवा शुल्क जमा करणे/अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रकिया विहीत वेळेत पुर्ण करणे अत्यावश्यक आहे. याची ई–निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

४) ई–निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. (तांत्रिक व व्यापारी).

५) **तांत्रिक लिफाफा क. ०१ मध्ये संस्थेने त्यांची सर्व आवश्यक कागदपत्रे विहीत नमुन्यामध्ये प्रपत्र–१ अन्वये सादर केलेली असावीत.**

. . २

६) **व्यापारी लिफाफा कमांक—२ मध्ये त्यांचे संस्थेने या कार्यालयाने विहीत केलेल्या नमून्याप्रमाणे प्रपत्र—२ अन्वये कंत्राटदारांनी भरावयाची आहे.**

७) तत्सम स्वरुपाचे काम करण्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

८) कंत्राटदारांनी/संस्थेनी/कंपनींनी निविदा प्रक्रियेसाठी निविदा अर्ज सादर करतांना त्यांचे कंपनीचे/संस्थेचे, नोंदणी प्रमाणपत्र/जीएसटी नोंदणी कराचे प्रमाणपत्र/मागील तीन व ािचे आयकर प्रमाणपत्र/पॅनकार्ड/ई.एस.आय.सी.प्रमाणपत्र/पी.एफ. प्रमाणपत्र/प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सादर केलेल्या निविदा उघडतेवेळी संबंधीत निविदाकारांनी उपरोक्त प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती तांत्रिक निविदेसोबत न जोडल्यास तसेच मुळ प्रती तपासणीसाठी सादर न केल्यास त्यांचे निविदा अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

९) खाजगी कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगाराची नांवे, त्यांचा पत्ता व त्यांच्या चारित्र्याविषयक प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करतील.

१०) सदर कामाकरिता कंत्राटदार यांना देय मोबदला हा एका महिन्याचा कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल. काही तांत्रिक अथवा अपरिहार्य कारणास्तव मोबदला देण्यास उशीर झाल्यास सदर रकमेवर व्याज देय राहणार नाही. तसेच देण्यात येणा—या मोबदल्यावर कर व त्यावरील कर भरण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदार यांची राहील.

११) न्यायालयातील इमारत व इमारतीचा परिसर, इमारतीतील स्वच्छतागृह, व्हरांडे, तसेच जिना हा परिसर त्यांना नियमित स्वच्छ ठेवावा लागेल. त्याचप्रमाणे व्हरांडा व जिन्यातील, इमारतीच्या छताला लागलेले जाळे स्वच्छ करावे लागेल.

१२) कर्मचा—यांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे कार्यालयाच्या गरजेनुसार ठरवतील. तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास काम करावे लागेल. त्यामूळे संबधी कंत्राटदार/सुपरवायझर यांनी कार्यालयाच्या सुट्टी पूर्वी याबाबत संबधीत कार्यालयात चौकशी करावी.

१३) साफसफाई करीता लागण—या आवश्यक वस्तू साधनसामुग्री याबाबतचा खर्च हा कंत्राटदार यांनी करावा तसेच कंत्राटदार यांनी नेमणूक केलेले कामगार हे सर्व एकासारख्या गणवेशात असावेत.

१४) कंत्राटदार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवावी आणि न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचे हस्तक्षेप होणार नाही याबाबत दक्षता घावी तसेच न्यायालयीन इमारतीमधील व परिसरातील विद्युत दिवे हे गरजेप्रमाणे चालू व बंद करण्याबाबतची जबाबदारी आणि प्रसाधनगृहामध्ये पाण्याचा वापर हे काटकसरीने करण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारावर राहील.

१५) कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा—यांकडून वक्तशीरपणे व नियमितपणे या कार्यालयातील कामे करवून घेतील. त्यांची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायित्व हे या कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेचा राहील.

१६) कंत्राटदार यांच्या व्दारे साफसफाई काम करणारे कंत्राटी कामगार यांना या कार्यालयाकडे कायमस्वरूपी नियुक्तीकरीता हक्क मागण्याचा अधिकार नाही यांची नोंद घेण्यात यावी. तसेच कंत्राटी कामगारास काम करतांना कोणतीही इजा, अपघात अथवा मुनष्यहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. तसेच प्रथम औषधउपचार एक पेटी १० कंत्राटी कामगारकरीता याप्रमाणे कायम स्वरूपी उपलब्ध करून ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदार यांची राहणार आहे.

१७) कंत्राटदाराकडून नेमलेल्या कंत्राटी कर्मचा—यांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे या कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदार यांना देय असलेल्या रकमेतून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

१८) सर्व ई—निविदा या जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथे दिलेल्या तारखेस व वेळी उघडण्यात येतील.

१९) केवळ ई—निविदा किंवा अनामत रक्कम जमा केली म्हणून कंत्राटदारास हक्क सांगता येणार नाही.

२०) कंत्राटदार यांना कंत्राटी दरम्यानच्या काळात वरील अटी व शर्तीचे पालन करीन असे हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

२१) साफसफाईचे काम सुरु झाल्यापासून पुढील दोन वर्षाकरीता असून साफसफाईसाठी लागणारे साहित्य, झाडू, ब्रश, निरमा, फिनेल, डांबरगोळया, ओडोनिल, बकेट, स्वच्छतेचे मशीन व सर्व सलग्न वस्तु इत्यादी ठेकेदारांनी स्वत:चे वापरावयाचे आहे.

२२) निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क न्यायालयाने/शासनाने राखून ठेवला आहे.

२३) प्राप्त झालेल्या निविदांमधून सर्व अटी व शर्तीचे/शासनाने वेळोवेळी प्रस्तुत केलेले शासन निर्णय /ज्ञापन/परिपत्रके यांचे पालन करुन पात्र ठरलेल्या निविदांमधील न्युनतम किंमतीची निविदा स्विकृत करण्यात येईल व प्राप्त झालेल्या सर्व निविदा मंजूरी प्रस्तावासह मा. उच्च न्यायालयामार्फत प्रशासकीय मान्यतेस्तव शासनाकडे सादर करण्यात येईल.

२४) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने ''कार्यालयाचा संपूर्ण परीसर त्यातील इमारती, स्वच्छतागृहे यांची पाहणी करुन त्यानुसार निविदा भरली आहे'' अशा आशयाचे हमीपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

२५) कंत्राटदार कंपनी संस्थेमार्फत काम करणा—यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा न्यायालयावर राहणार नाही.

२६) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांच्यामार्फत दिल्या जाणा—या सेवा/सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहिल.

२७) कंत्राटदार यांना एकूण कंत्राटाच्या रकमेच्या ५ टक्के बॅंक गॅरंटी ही दोन वर्षाकरिता द्यावी लागेल तसेच त्यांनी कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास, बॅंक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा हक्क या कार्यालयास राहील. सेवाकराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दुस—या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करून घेतले जाईल.

२८) अनामत रक्कम व टेंडर फी ऑनलाईन प्रणालीने स्विकृत होणार आहे.

स्वाक्षरी/—
प्र. प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे

ठिकाण : पुणे
दिनांक : २८/११/२०२३

# हमीपत्र

मी, श्री.--------------------------------, प्रो.प्रा. ---------------- -----------एंटरप्रायजेस, पत्ता, --------------------, संस्थेचा नोंदणी क्रमांक -------------, संस्थेचा दुरध्वनी क्रमांक --------, याद्वारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहिर करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालय, पुणे येथील व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयाचे क्षेत्रफळानुसार साफसफाईचे काम शासनमान्य कंत्राटदारामार्फत कंत्राटी सेवेने (आऊटसोर्सिंगद्वारे) करुन घ्यावयाच्या कामाकरीता दोन वर्ष कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी कामाची निविदा भरताना निविदा अर्जासोबतचे निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहीती करुन त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच मी सदर कामासाठीच्या सर्व अटी व शर्तींचे पालन करु.

आपल्या कार्यालयालाने सदर सेवासाठी निर्गमित केलेला निर्देशन आमचे कंपनीस बंधनकारक राहतील.

ठिकाण : पुणे
दिनांक : / /२०२३

स्वाक्षरी :—
पुरवठादाराचे नांव पत्ता शिक्यासह :—